
# उन्मळले 'आनंदाचे झाड'

## (ज्येष्ठ दिवंगत साहित्यिक शं. ना. नवरे यांच्या काही हृदयस्पर्शी आठवणी)

मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक शं. ना. नवरे यांचे २५ सप्टेंबर २०१३ रोजी डोंबिवली येथे निधन झाले. सर्व महाराष्ट्रात ते 'शन्ना' म्हणून प्रसिद्ध होते. कथा, चित्रपट, नाटके, ललित लेखन, स्तंभलेखन या सर्व साहित्यक्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. चित्रविचित्र हकीगतींचा खजिना बाळगणारे ते एक श्रीमंत लेखक होते. बोलणे त्यांना प्रिय होतेच, परंतु त्यापेक्षा संवादावर त्यांचा अधिक भर होता. संवाद करताना जवळच्या हकीगती ते अगदी मुठीमुठीने वाटत. या प्रतिभावान लेखकात माणूसपणही प्रचंड होते. सुदैवाने वर्षातून एक-दोन दिवस त्यांच्या सान्निध्यात राहण्याचे भाग्य आम्हा कालिकावाडीतील ग्रामस्थांना लाभले. त्यांचा हा सहवास आमच्यासाठी एक आनंदपर्वणीच होती.



रत्नागिरी देवगड किनारी रोडवरील आडिवरे हा एक प्रसिद्ध गाव. तेथून दोन कि.मी. अंतरावर कालिकावाडी हा आमचा गाव. येथे श्री कालिकादेवीचे मंदिर आहे. ही देवी शन्नांची कुलस्वामिनी. त्यामुळे ते प्रतिवर्षी कालिकामातेच्या दर्शनासाठी कुटुंबासह येत. येथील वेदमूर्ती हर्डीकर गुरुजींकडे त्यांचा मुक्काम असायचा. पांढरा सदरा, त्यावर निळसर रंगाचे जाकीट, धोतर किंवा लेंगा असा त्यांचा पोशाख असायचा. गौरवर्ण व सदा प्रसन्न टवटवीत चेहरा!

शन्ना येथील लोकांना सांगत, 'कोकणचे कोकणपण जपा. कोकणातील घरे कोकणासारखीच असू द्या. मला डोंबिवलीच्या घरातील लादी, सोफा-सेट, खुर्च्या, टेबले यांच्या सततच्या वापराने कंटाळा येतो. जमिनीवर बसणे, झोपणे, लोळणे यात मला खूप आनंद वाटतो. निदान 'ओटीवरच्या' जमिनीचेतरी अस्तित्व ठेवा. डोंबिवलीला दिवसातून दोन कप चहा घेणारे शन्नाकाका येथे मात्र पाच-सहा वेळा चहा पीत. म्हशीच्या ताज्या दुधाचा स्वादिष्ट चहा त्यांना फार आवडायचा. हर्डीकर गुरुजी शिस्तीसाठी आपल्या मुलांना एकदा रागावताना शन्नांनी पाहिले. तेच गृहस्थ सूर्यास्त झाल्यानंतर मात्र केळीची पाने तोडू नका रे! म्हणून मुलांना सांगत. एका छोट्या झाडासाठी हळवे होतात. प्रारंभी कठोर वाटणारा हा माणूस एका वृक्षाला दुःख होऊ नये म्हणून एवढे जपतो. मग माणसाच्या मनाची पारख तरी कशी करायची? आपल्या 'हरीतात्या' या कथेमध्ये त्यांनी या प्रसंगाचे चित्रण केले आहे. रात्रीचे जेवण आटोपल्यानंतर शन्नाकाका ग्रामस्थांसोबत मंदिरात येत. पत्त्यांच्या खेळात सहभागी होत. पत्त्यांचा डाव रात्री १ ते २ वाजेपर्यंत चालायचा. चहा आणि गरम भज्यांचा आस्वाद घेत. स्वतः जवळ असामान्यत्व असूनही ते आम्हा सामान्य लोकांत मिसळत, गप्पा मारत. 'मृदू सबाह्य नवनीत' या संत तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणे त्यांचे आंतरबाह्य मन कोमल व स्वच्छ होते.

२६ डिसेंबर २००७ चा दिवस! त्या दिवशी शन्नाकाका येथे आले होते. आम्ही कालिकामंदिरात त्यांचा व त्यांच्या पत्नीचा (अंजलीवहिनी) छोटासा सत्कार समारंभ आयोजित केला होता. ते ज्या ठिकाणी उतरले होते तेथे सत्कारासाठी त्यांची परवानगी घेण्यासाठी गेलो. त्यांना कार्यक्रम पत्रिका दिली, ती त्यांनी अगदी न्याहाळून पाहिली. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. त्यांनी विचारले, ही कार्यक्रमपत्रिका कोणी तयार केली? मी म्हणालो, 'मीच केली'. कार्यक्रम पत्रिकेतील शुद्धलेखनाला त्यांनी दाद दिली. शहरात होणाऱ्या कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रम पत्रिकेतील शुद्धलेखन लोप पावत चालले आहे, अशी खंतही व्यक्त केली. त्यांच्या या प्रशंसेमुळे माझ्या अंगावर मूठभर मांस चढले. सत्कार समारंभात त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल अल्पबुद्धीने जे काही बोललो त्याबद्दल पोलीस खात्याचेच काम केले आहे म्हणून माझे कौतुक केले. ग्रामस्थांनी केलेला हा सत्कार त्यांना त्यांच्या इतर सत्कारांपेक्षा व पुरस्कारांपेक्षा मनापासून मोठा वाटला, कारण या सत्कारामध्ये माहेरचे प्रेम होते. आमच्या प्रेमाने ते भारावले आणि त्यांच्या डोळ्यांतून नकळत दोन अश्रू ओघळले. थोड्याच वेळात 'किल्ली हरवते तेव्हा' ही विनोदी कथा सांगून त्यांनी सर्व श्रोत्यांना मनमुराद हसवले. माझ्या वृत्तपत्रीय लेखनाला त्यांनी अभिप्रायही लिहिला. सुंदर व रेखीव हस्ताक्षरातील हा अभिप्राय माझ्यासाठी अनमोल ठेवा आहे.

त्यानंतर प्रतिवर्षी ते इकडे येत असत. तोच उत्साह, तेच प्रेम. निधनापूर्वी दीड वर्षे त्यांचे शेवटचे येणे झाले. पायाच्या दुखण्यामुळे त्यांना चालता येत नव्हते. आम्ही आधार देऊन त्यांना मंदिरात नेले. त्यांनी दर्शन घेतले. शारीरिक व्याधी असूनही त्यांचा बोलण्याचा व संवादाचा धबधबा सुरूच होता. एवढ्यात रामायणाचा विषय निघाला. ते म्हणाले, 'रामाला एक बहीण होती तिचे नाव 'शांता' होते. दशरथ राजाने ही मुलगी एका निपुत्रिक मित्र राजाला दत्तक दिली होती. रामायणातील अशी बारीकसारीक माहिती किती जणांना अवगत असेल?

शन्नाकाकांच्या निधनाची वार्ता समजताच आम्ही ग्रामस्थ उदास झालो. आनंदाचे झाडच उन्मळून गेले असे वाटले, मात्र ते आमच्या आसपास आहेत असे अजूनही वाटते, कारण आनंदयात्री शन्नाकाकांनी आमच्यासाठी आठवणींचा सुगंध अक्षय दरवळत ठेवला आहे.

**श्रीकांत यशवंत पाध्ये,**
मो. नं. ९२०९१०९८५९